सोलापूर विद्यापीठ
पी.जी.प्रवेश विभाग
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स)
विस्तृत क्र. ११५ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: bcud@sus.ac.in / pgadmission@sus.ac.in

NAAC Accredited-2015
B Grade (CGPA 2.62)

Solapur University
PG Admission Section
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No. 0217- 2744778 (11 lines)
Ext. No. 115. Fax No.0217-2744770
Website : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
E-mail : bcud@sus.ac.in / pgadmission@sus.ac.in

संदर्भ क्र. सोविसो/पी.जी.प्रवेश/ 5357 दिनांक 26 JUN 2018

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुले
सोलापूर, विद्यापीठ, सोलापूर

विषय :- महाविद्यालयामध्ये व विद्यापीठ संकुलामधील विविध अभ्यासक्रमास प्रवेशाकरिता ऑनलाईन आवेदन पत्र सादर करणेबाबत.
संदर्भ:- दि. २२/०६/२०१८ रोजी विद्यापीठामध्ये महाविद्यालय व संकुलातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी आयोजित कार्यशाळा.

महोदय / महोदया,

महाविद्यालयातील व विद्यापीठ संकुलातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यावरील कामाचा बोजा कमी करण्याकरिता विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातील व विद्यापीठ संकुलामधील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशाकरिता आवेदन पत्र सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरु करण्याची बाब विद्यापीठ प्रशाशनाच्या विचारार्थ होती. त्यास अनुसरुन सदर ऑनलाईन प्रक्रियेबाबत संदर्भिय प्रशिक्षण आयोजित केले होते.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे प्रवेश करण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतले आहेत किंवा प्रवेश घेण्यास इच्छुक आहेत अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Online Application for Admission /Enrollment या Link वरुन प्रवेशाबद्दलचे आवेदन पत्र सादर करण्याची सुचना महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना द्यावी.
२. ज्या इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ऑनलाईन आवेदन पत्र सादर केले आहे त्यांनी दोन दिवसाच्या आत संबंधित महाविद्यालयामध्ये आवेदन पत्राची प्रिंन्ट सादर करणे बंधनकारक आहे.
३. महाविद्यालयाने इच्छुक विद्यार्थ्यांच्या आवेदन पत्रानुसार विद्यापीठ व शासन नियमानुसार सर्व प्रक्रिया पार पाडून विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
४. विद्यार्थ्यांने प्रवेशासाठी ऑनलाईन आवेदन पत्र सादर केले याचा अर्थ संबंधित विद्यार्थ्याला प्रवेश मिळेलच असे नाही.
५. विद्यार्थी पात्रतेनुसार एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमांना व एकापेक्षा जास्त महाविद्यालयास प्रवेशासाठी आवेदन पत्र सादर करु शकतो.
६. महाविद्यालयामध्ये व विद्यापीठ संकुलामधील प्रवेशाबाबतचे सर्व अधिकार संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापीठ संकुलाचे संचालक यांच्याकडे नियमानुसार राहतील.

७. महाविद्यालयांनी विद्यापीठ संकुलातील विद्यापीठ व शासन नियमानुसार ज्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयामध्ये / संकुलामध्ये प्रवेश निश्चित केले आहे. अशा विद्यार्थ्यांची विद्यापीठाच्या सॉफ्टवेअरमध्ये संदर्भिय प्रशिक्षणामध्ये सुचना दिल्याप्रमाणे प्रवेश निश्चित करावेत.

८. ज्या विद्यार्थ्यांनी सोलापूर विद्यापीठाचे पदवी प्राप्त केली व ज्यांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावयाचा आहे. अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयाच्या लॉगीनमधून Registered Candidate Link मधून करावी.

९. ज्या विद्यार्थ्यांनी सोलापूर विद्यापीठ व्यतिरीक्त इतर विद्यापाठाची पदवी प्राप्त केली आहे व प्रस्तुत विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास इच्छुक आहेत अशा विद्यार्थ्यांनी Online Application for Admission /Enrollment या Link द्वारे ऑनलाईन प्रवेश आवेदन पत्र सादर करावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा.डॉ.व्ही.बी.पाटील)
विशेष कार्यासन अधिकारी,
शैक्षणिक, संशोधन व विकास